IV. अक्षरात दिलेल्या संख्या पुढे दिलेल्या स्थानमूल्य कोष्टकात लिही.

उदा : आठशे एकवीस

शतक	दशक	सुटे
8	2	1

1. चारशे सात

शतक	दशक	सुटे

2. एकशे अठ्ठ्याऐंशी

शतक	दशक	सुटे

3. पाचशे पस्तीस

शतक	दशक	सुटे

4. सातशे त्रेपन्न

शतक	दशक	सुटे

5. सहाशे साठ

शतक	दशक	सुटे

6. दोनशे वीस

शतक	दशक	सुटे

7. तीनशे चव्वेचाळीस

शतक	दशक	सुटे

8. नऊशे नव्याण्णव

शतक	दशक	सुटे

9. सातशे

शतक	दशक	सुटे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उडया मारा आणि शिका



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पुट्टू, मेरी व जानू घरातल्या पाळीव प्राण्यांबरोबर व पक्षांबरोबर फावल्या वेळेत खेळत असतात. ते पाळीव प्राणी व पक्षी यांना वेगळ्या पद्धतीने उडया मारण्यास सुचवितात. तू पण त्यांच्याबरोबर उडया मार व शीक



एक पाऊल पुढे उडी मार

104, 105, 106, 107, 108, 109, 110, 111

एक पाऊल मागे उडी मार



179, 180, 181, 182, 183, 184, 185, 186



दोन पावले पुढे उडी मार व रिकाम्या जागी संख्या लिही.

390, 392, 394, ____, ____, 400, ____

दोन पावले मागे उडी मार व रिकाम्या जागी संख्या लिही.



286, ____, ____, ____, 294, 296, 298, 300



पाच पावले पुढे उडी मार व रिकाम्या जागी संख्या लिही.

700, 705, 710, ____, ____, ____, ____, 735

पाच पावले मागे उडी मार व रिकाम्या जागी संख्या लिही.



____, ____, ____, ____, ____ 615, 620, 625



दहा पावले पुढे उडी मार व रिकाम्या जागी संख्या लिही.

470, 480, ____, ____, ____, ____, ____ 540

दहा पावले मागे उडी मार व रिकाम्या जागी संख्या लिही.



____, ____, ____, ____, ____ 880, 890, 900

NOT TO BE REPUBLISHED © KTBS


रिकाम्या जागी योग्य संख्या लिही.



1. 300, 310, ____, ____, ____, ____, 360, ____
2. 400, 450, ____, ____, ____, ____, ____, 750
3. 800, 798, 796, ____, ____, ____, ____, 786
4. 201, 203, ____, ____, 209, ____, ____, 215
5. 999, 899, ____, ____, ____, ____, ____, 299
6. 675, 680, ____, ____, ____, ____, ____, 710

विचार कर

1. चिंटू नावाचा ससा कशा प्रकारे घराच्या छपरावर चढतो व उतरतो हे बाणाच्या सहाय्याने दाखव व पायऱ्यावर असणारी संख्या वाच व ओळख.




2. संपत व निधी नदीपलीकडे असणाऱ्या आपल्या मित्रांना भेटण्यास जाणार आहेत. त्यांनी 200 च्या दगडापासून 600 च्या दगडापर्यंत कशी उडी मारावी?




© KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. उंदराला पोत्यातील धान्य खाण्याची इच्छा आहे. परंतु वाटेत त्याचे शत्रू मांजर व साप आहेत. तरी उंदराला धान्य खाणे शक्य होते ते कसे?



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सापाचा आहार



अभ्यास 2.3

I. खालील संख्येच्या पुढील संख्या लिही.

1. 99, ___
2. 200, ___
3. 350, ___
4. 409, ___
5. 175, ___
6. 630, ___
7. 899, ___
8. 998, ___
9. 799, ___
10. 529, ___

II. खालील संख्यांच्या आधीची संख्या लिही.

1. ___ , 101
2. ___ , 300
3. ___ , 210
4. ___ , 490
5. ___ , 500
6. ___ , 650
7. ___ , 811
8. ___ , 777
9. ___ , 900
10. ___ , 700

III. खालील संख्यांच्या मधील संख्या लिही.

1. 99, ___ , 101
2. 724, ___ , 726
3. 309, ___ , 311
4. 189, ___ , 191
5. 276, ___ , 278
6. 400, ___ , 402
7. 699, ___ , 701
8. 898, ___ , 900
9. 549, ___ , 551
10. 998, ___ , 1000

IV. नमुन्या प्रमाणे पुढे दिलेल्या रिकाम्या जागा भर.

उदा : 100, 105, 110, 115, 120, 125, 130, 135

1. 296, 298, ___ , ___ , ___ , 306, ___ , 310

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

2. 400, ___ , 420, 430, ___ , ___ , 460, ___ , 480

3. 801, ___ , ___ , 804, 805, ___ , ___ , 808

4. 900, 903, ___ , ___ , ___ , ___ , ___ , 921

5. 640, 660, ___ , ___ , ___ , ___ , ___ , 780

V. दिलेल्या नमुना उदाहरणा प्रमाणे रिकाम्या जागा भर.

उदा: 200, 198, 196, 194, 192, 190, 188, 186

1. 300, 295, ___ , ___ , ___ , ___ , ___ , 265

2. 500, 450, 400, ___ , ___ , ___ , ___ , 150

3. 800, 790, ___ , ___ , ___ , ___ , ___ , 730


4. 990, 970, 950, ___ , ___ , ___ , ___ , 850

5. 790, 789, ___ , ___ , ___ , ___ , ___ , 783

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

मोठी संख्या असलेला प्राणी कोणता?

हत्ती व हरीण या दोघांमध्ये कोणाजवळ असलेली संख्या मोठी आहे? ही चर्चा सुरु आहे. त्याचवेळी तेथे ससा येतो व म्हणतो 'तुमच्याजवळ असलेल्या संख्येपेक्षा माझ्याजवळची संख्या मोठी आहे''.



नंतर तेथे उंदीर येतो व म्हणतो '' माझ्याजवळची संख्या मोठी आहे. तुम्हा सर्वांच्या जवळची संख्या लहान आहे'' पटत नसेल तर बुद्धिमान असणाऱ्या कोल्हयाकडे जाऊन विचारुया''.

हत्ती, हरीण व ससा यांना उंदराचे म्हणणे पटते, चौघेही कोल्ह्याकडे जातात व आपली समस्या त्याच्यापुढे मांडतात. कोल्हा सर्वांचे म्हणणे ऐकतो व उंदराजवळ असलेली संख्या सर्वात मोठी आहे व हत्तीजवळ असणारी संख्या सर्वात लहान आहे असा निर्णय देतो.

कोल्हयाने दिलेला निर्णय बरोबर आहे का? खालील रिकाम्या जागा भर व कोल्ह्याचा निर्णय बरोबर की चूक ते सांग.

1. हत्तीजवळ असणारी संख्या _____ हरणाजवळ असणारी संख्या _____ यामध्ये मोठी संख्या _____
2. हरणाजवळ असणारी संख्या _____ सशाजवळ असणारी संख्या _____ यामध्ये लहान संख्या _____
3. सशाजवळ असणारी संख्या _____ उंदराजवळ असणारी संख्या _____ यामध्ये मोठी संख्या _____
4. हरीण व उंदीर या दोघांजवळील असलेल्या संख्येमध्ये मोठी संख्या _____
5. हत्ती व ससा या दोघांजवळील असलेल्या संख्येमध्ये लहान संख्या _____
6. हत्ती, हरीण व ससा या तिघांजवळील संख्येमध्ये सर्वात मोठी संख्या_____
7. हत्ती, हरीण व ससा या तिघांजवळील संख्येमध्ये सर्वात लहान संख्या _____
8. हत्ती, उंदीर व ससा या तिघांजवळील संख्येमध्ये सर्वात मोठी संख्या _____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

निरीक्षण कर व समजून घे

वरील प्रश्नांची उत्तरे देण्यास तुला शक्य झाले काय? अशक्य वाटल्यास मोठी संख्या व लहान संख्या कशी ओळखावी याची माहिती पुढे दिलेली आहे. ती वाच व समजून घे.

1. हत्ती, हरीण, ससा व उंदीर यांच्या अंगावरील संख्या स्थानमूल्य यादीमध्ये लिही.

प्राण्याचे नांव	शतक	दशक	सुटे
ससा	3	2	5
उंदीर	4	7	5
हत्ती	1	5	7
हरीण	2	6	3

शतक स्थानात असणाऱ्या अंकाची तुलना कर.

3, 4, 1, 2 यामध्ये सर्वात मोठा अंक - 4

यामध्ये सर्वात लहान अंक - 1

म्हणून 325, 475, 157, 263 या संख्येमध्ये

सर्वात मोठी संख्या - 475

सर्वात लहान संख्या- 157

2. खालील ध्वजावर लिहिलेल्या संख्यांचे निरीक्षण कर.



या संख्या स्थानमूल्य यादीमध्ये लिही

शतक	दशक	सुटे
5	6	0
5	2	4
5	4	8
5	9	9
5	7	1

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

येथे शतक स्थानातील सर्व अंक समान आहेत, म्हणून दशक स्थानातील अंकांची तुलना कर.

6, 2, 4, 9, 7 यामध्ये सर्वात मोठा अंक - 9

सर्वात लहान अंक - 2

म्हणून 560, 524, 548, 599, 571 या संख्यांमध्ये

सर्वात मोठी संख्या - 599

सर्वात लहान संख्या - 524

3. खालील पानांवर लिहिलेल्या संख्यांचे निरीक्षण कर.



या संख्या स्थानमूल्य यादी मध्ये लिही

शतक	दशक	सुटे
8	6	7
8	6	1
8	6	4
8	6	5
8	6	3

© KTB NOT TO BE REPUBLISHED

येथे शतक स्थानातील सर्व अंक समान आहेत. त्याच प्रमाणे दशक स्थानातील पण सर्व अंक समान आहेत म्हणून सुटे स्थानातील अंकांची तुलना कर.

7, 1, 4, 5, 3 यामध्ये सर्वात मोठा अंक- 7

सर्वात लहान अंक- 1

म्हणून 867, 861, 684, 685, 863 या संख्यांमध्ये

सर्वात मोठी संख्या - 867

सर्वात लहान संख्या- 861

कोणाला जास्त ? कोणाला कमी?

S.S.L.C मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी वार्षिक परीक्षेत मिळविलेले गुण त्यांच्या हातात आहेत.

कोणाला जास्त ? व कोणाला कमी ? निरीक्षण करून विचार कर व सांग.



1. सर्वात जास्त गुण _____
2. सर्वात कमी गुण _____
3. दोघांनी समान मिळविलेले गुण _____
4. मुलांमध्ये सर्वात जास्त गुण _____
5. मुलींमध्ये सर्वात जास्त गुण _____
6. मुलांमध्ये सर्वात कमी गुण _____
7. मुलींमध्ये सर्वात कमी गुण _____
8. 400 गुणांना 4 गुण कमी _____
9. 500 गुणांना 10 गुण जास्त _____
10. 500 गुणांना 10 गुण कमी _____

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

निरीक्षण कर

तीन अंकी संख्यांची तुलना करताना प्रथम शतक स्थानी असलेल्या अंकांची तुलना करा. त्यामध्ये जो अंक मोठा असेल ती संख्या मोठी असते.

शतक स्थानातील अंक समान असतील तर दशक स्थानातील अंकांची तुलना करा, दशक स्थानातील अंक समान असतील तर सुटे स्थानातील अंकांची तुलना करा आणि मोठी संख्या व लहान संख्या ओळखा.

चढता क्रम / उतरता क्रम

मागील इयतेत एक अंकी व दोन अंकी संख्या चढत्या व उतरत्या क्रमाने कशी लिहितात. हे तू जाणून घेतले आहेस.

आता तीन अंकी संख्या चढत्या व उतरत्या क्रमाने कशी लिहावी ते आपण समजून घेऊ.

करुन पहा व शीक.

999 पर्यंत संख्या लिहिलेल्या लहान लहान आकाराची कार्डे तयार कर ती सर्व दुमडून एका डब्यात ठेव.

आता त्यातील सहा कार्डे बाहेर काढ.


तुला 225, 352, 561, 833, 417, 799 या संख्या आल्या आहेत.

शतक स्थानातील अंक म्हणजे 2, 3, 5, 8, 4, 7 आहेत. हे शतक स्थानातील अंक चढत्या क्रमात लिही. 2, 3, 4, 5, 7, 8

आता या संख्या चढत्या क्रमात लिही - 225, 352, 417, 561, 799, 833

> दिलेल्या संख्या चढत्या क्रमात लिहिताना त्या संख्येतील सर्वात लहान संख्येपासून सुरुवात कर.

आता या संख्या उतरत्या क्रमात लिही - 833, 799, 561, 417, 352, 225



© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

तू प्रयत्न करुन बघ.

तुझ्या मित्राला डब्यातून सहा कार्डे बाहेर काढायला सांगा. त्या कार्डावरील संख्या 472, 477, 478, 475, 476, 473 आहेत असे समजून घे.

प्रथम शतक स्थानातील अंकाची तुलना कर. ते सर्व अंक समान आहेत.


नंतर दशक स्थानातील अंकांची तुलना कर. ते पण सर्व अंक समान आहेत.

आता सुटे स्थानातील अंक 2, 7, 8, 5, 6, 3 हे अंक उतरत्या क्रमात लिही- 8, _____, _____, _____, _____, _____

या संख्या उतरत्या क्रमाने लिही - 478,____, ____, ____, ____, ____

या संख्या चढत्या क्रमाने लिही - 472,____, ____, ____, ____, ____


करुन पहा व शीक




@KSB NOT TO BE REPUBLISHED

वरील चित्रातील प्राण्यावर काही संख्या लिहिल्या आहेत. या प्राण्याची व संख्याची तुलना करुन खालील रिकाम्या जागा भर.

या संख्या चढत्या क्रमात लिही



या संख्या चढत्या क्रमात लिहून त्या संख्येच्या प्राण्यांची नांवे लिही



अभ्यास 2.4

I. खाली दिलेल्या संख्येतील मोठी संख्या व लहान संख्या ओळख व चौकोनात लिही.

	मोठी संख्या	लहान संख्या
उदा : 101, 110	110	101
1. 125, 521		
2. 999, 909		
3. 772, 774		
4. 501, 105		
5. 842, 824		

II. खालील दिलेल्या संख्यांमध्ये सर्वात मोठी संख्या ओळख व त्या संख्ये खाली रेष मार.

उदा : 211, 112, 221, 121, 111

1. 811, 801, 810, 809, 812
2. 336, 346, 386, 316, 376
3. 666, 660, 665, 663, 667
4. 740, 770, 780, 710, 720
5. 901, 910, 920, 903, 902

III. खाली दिलेल्या संख्यातील सर्वात लहान संख्या ओळख व त्या संख्येखाली रेष मार.

उदा: 327, 273, 372, 732, 237

1. 416, 406, 426, 462, 460
2. 700, 500, 200, 300, 400
3. 183, 187, 181, 190, 189

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. 572, 576, 571, 575, 574
5. 236, 216, 246, 276, 256

IV. खाली दिलेल्या संख्या चढत्या क्रमात व उत्तरत्या क्रमात लिही.

उदाहरण: 567, 467, 967, 767, 267
चढता क्रम : 267, 467, 567, 767, 967
उतरता क्रम : 967, 767, 567, 467, 267

1. 477, 873, 783, 580, 986
   चढता क्रम :
   उतरता क्रम :

2. 888, 808, 880, 80, 88
   चढता क्रम :
   उतरता क्रम :

3. 415, 428, 409, 472, 447
   चढता क्रम :
   उतरता क्रम :

4. 645, 642, 649, 647, 644
   चढता क्रम :
   उतरता क्रम :

5. 501, 301, 101, 601, 201
   चढता क्रम :
   उतरता क्रम :

6. 701, 770, 707, 77, 777
   चढता क्रम :
   उतरता क्रम :

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

संख्येची रचना

0	1	2	3	4	5	6	7	8	9

अंक लिहिलेल्या एकाच आकाराची 10 कार्डे तयार कर ती कार्डे एका डब्यात ठेव.

स्थानमूल्य यादी एका कागदावर किंवा जमिनीवर लिहून ठेव.

शतक	दशक	सुटे

कृती 1 :

डब्यातून कोणतीही 3 कार्डे काढून घे

उदा : तू घेतलेल्या कार्डावरील अंक 3 1 7 असतील तर

प्रथम सर्वात मोठा अंक कोणता ते ओळख.

3 1 7 मध्ये सर्वात मोठा अंक 7

नंतर सर्वात लहान अंक ओळख.

3 1 7 मध्ये सर्वात लहान अंक 1

आता सर्वात मोठा अंक शतक स्थानात व सर्वात लहान अंक सुटे स्थानात व उरलेला अंक दशक स्थानात ठेव.

शतक	दशक	सुटे
7	3	1

= 731

नंतर वाच - सातशे एकतीस

ही संख्या वहीमध्ये लिही.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ही कार्डे घेऊन शतक स्थानामध्ये सर्वात लहान अंक, सुटे स्थानामध्ये सर्वात मोठा अंक व उरलेला अंक दशक स्थानात ठेव.

शतक	दशक	सुटे
1	3	7

= 137

नंतर वाच एकशे सदतीस

137 ही संख्या वही मध्ये लिही.

नंतर वहीमध्ये लिहून घेतलेल्या संख्यांची तुलना कर

731, 137 मध्ये मोठी संख्या- 731

731, 137 मध्ये लहान संख्या - 137

म्हणून,

3, 1, 7 या अंकांचा वापर करुन तयार होणारी मोठी संख्या - 731

3, 1, 7 या अंकांचा वापर करुन तयार होणारी लहान संख्या- 137

कृती 2:

डब्यातून कोणतीही 3 कार्डे काढून घे.

उदाहरण : तू घेतलेल्या कार्डावरील अंक - 4 9 0 आहेत.

आता खाली दाखविल्याप्रमाणे वेगवेगळ्या पद्धतीने स्थानमूल्य यादीमध्ये ठेऊन ती संख्या वाच. वही मध्ये लिहून घे.

शतक	दशक	सुटे	
4	9	0	- चारशे नव्वद
4	0	9	- चारशे नऊ
9	4	0	- नऊशे चाळीस
9	0	4	- नऊशे चार
0	4	9	- एकोणपन्नास
0	9	4	- चौऱ्याण्णव

@KBS NOT TO BE REPUBLISHED

वहीमध्ये लिहून घेतलेल्या संख्यांची परस्पर तुलना करुन बघ.

490, 409, 940, 904, 049, 094

प्रथम शतक स्थानातील सर्वात मोठा अंक कोणता ते लिही.

940 व 904

यामध्ये दशकस्थानातील अंक ओळख

4 व 0. यामध्ये 4 हा अंक मोठा आहे.

म्हणून 940 व 904 मध्ये मोठी संख्या 940

नंतर शतक स्थानातील सर्वात लहान अंक कोणता ते लिही.

049 व 094

यामध्ये दशक स्थानातील अंक ओळख

4 व 9 यामध्ये 4 लहान आहे.

म्हणून 049 व 094 मध्ये लहान संख्या 049

म्हणून 4, 9 व 0 हे अंक वापरुन होणारी सर्वात मोठी संख्या - 940

म्हणून 4, 9 व 0 हे अंक वापरुन होणारी सर्वात लहान संख्या - 49

@KTRS NOT TO BE REPUBLISHED


अभ्यास 2.5

1. खालील अंक वापरुन सर्वात मोठी व सर्वात लहान संख्या तयार कर.

	सर्वात मोठी संख्या	सर्वात लहान संख्या
उदाहरण : 2, 7, 0	720	027
1) 9, 1, 5		
2) 6, 3, 7		
3) 0, 9, 0		
4) 5, 6, 0		
5) 7, 8, 9		

संख्या रेषा

खालील चित्राचे निरीक्षण कर उत्तर दे.



1. 140 व 160 यामध्ये असणारी संख्या _____
2. 180 ही संख्या _____ व _____ च्या मध्ये आहे.
3. 120 च्या पुढची संख्या _____
4. 150 च्या मागील संख्या _____
5. 160 च्या उजव्या बाजूची संख्या _____
6. 110 च्या डाव्या बाजूची संख्या _____
7. 140 ही संख्या 170 च्या _____ बाजूला आहे (डाव्या, उजव्या)
8. 190 ही संख्या 150 च्या _____ बाजूला आहे (डाव्या, उजव्या)


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

लक्षात ठेव

* संख्यारेषा ही एक सरळरेषा आहे
* संख्यारेषेवर समान अंतरावर संख्या क्रमाने लिहिलेल्या असतात.


संख्यारेषेवर कोणत्याही बिंदूपासून उजवीकडे गेल्यास त्या सर्व संख्यांची किंमत वाढत जाते.

ते कसे हे खालील उदाहरणाने समजून येते.



बाणाच्या सहाय्याने दाखविल्यानुसार 300 च्या उजवीकडील संख्यांचे निरीक्षण कर. त्या संख्यांची किंमत वाढत गेली आहे.


* संख्यारेषेवर कोणत्याही बिंदूपासून डावीकडे गेल्यास त्या सर्व संख्याची किंमत कमी होत जाते. ते कसे हे खालील उदाहरणांवरुन समजून येते.



बाणाच्या सहाय्याने दाखविल्यानुसार 580 च्या डावीकडील संख्यांचे निरीक्षण कर. त्या संख्यांची किंमत कमी कमी होत गेली आहे.

तू प्रयत्न करुन बघ.

या संख्यारेषेचे निरीक्षण कर व उत्तरे दे




1. 550 व 650 च्या मधली संख्या _____
2. 450 ही संख्या _____ व _____ या संख्येच्या मध्ये आहे.
3. 650 च्या पुढील संख्या _____
4. 400 च्या मागील संख्या _____
5. 700 ही संख्या 450 च्या _____ बाजूला आहे (डाव्या/उजव्या)
6. 500 ही संख्या 850 च्या _____ बाजूला आहे (डाव्या/उजव्या)

@KBS NOT TO BE REPUBLISHED


अभ्यास 2.6

I. खाली दिलेल्या संख्या, संख्यारेषेवर अधोरेखित करुन ओळखा.


1) 600




2) 315




3) 702




4) 890



5) 910



II. ही संख्यारेषा पहा आणि उत्तरे दे.



©KTES NOT TO BE REPUBLISHED

1) 428 च्या उजवीकडील संख्या _____

2) 416 च्या उजवीकडील संख्या _____

3) 428 व 436 च्या मधली संख्या _____

4) 404 ही संख्या _____ व _____ या संख्यांच्या मध्ये आहे.

5) 412 ही संख्या 428 च्या _____ बाजूला आहे. (डाव्या/उजव्या)

6) 416 व 436 मध्ये _____ या संख्येची किंमत जास्त आहे.

*****

प्रकरण 3

बेरीज



F5L6P3


हे प्रकरण शिकल्यानंतर तू

- चित्रामध्ये व गोष्टीमध्ये व्यक्त झालेल्या वेगवेगळ्या संदर्भानुसार बेरजेची उदाहरणे सोडवशील.
- स्थानमूल्य कोष्टकाचा वापर करुन बेरीज करशील.
- तीन अंकी संख्या उभ्या ओळीत लिहून, हातचा घेऊन व हातचा न घेता बेरीज करशील.
- बेरजेची गणितातील उदाहरणे तयार करशील.
- 99 पेक्षा कमी असलेल्या दोन संख्यांची अंदाजे बेरीज करु शकशील.

© KTDS NOT TO BE REPUBLISHED

बेरजेचा खेळ

हाय! मी पिंकी हे माझ्या मालकाचे घर आहे. किती मोठे घर आहे ना? यामध्ये 100 खोल्या आहेत. काही खोल्यांना रंग द्यावयाचा आहे.



91	92	93	94	95	96	97	98	99	100
81	82	83	84	85	86	87	88	89	90
71	72	73	74	75	76	77	78	79	80
61	62	63	64	65	66	67	68	69	70
51	52	53	54	55	56	57	58	59	60
41	42	43	44	45	46	47	48	49	50
31	32	33	34	35	36	37	38	39	40
21	22	23	24	25	26	27	28	29	30
11	12	13	14	15	16	17	18	19	20
1	2	3	4	5	6	7	8	9	10




5 नंबरच्या खोलीला रंग दिलेला आहे. नंतर 15 व्या खोलीला रंग द्यायचा आहे. तिथे जाण्यासाठी दोन मार्ग आहेत.

1) 5 व्या खोलीनंतर एकेक खोलीत क्रमाने जाऊन 15 व्या खोलीपर्यंत पोहोचणे.
   उदा : 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15 (5+10=15)

2) 5 व्या खोलीपासून वर उडी मारणे तशी उडी मारल्यास मी एकदम 10 खोल्या पार करुन 15 व्या खोलीपर्यंत जाऊन पोहोचल्यासारखे होईल.


5 + 10 = 15



विचार कर

* 15 व्या खोलीपासून 45 व्या खोलीकडे जाण्यास ____ वेळा उड्या माराव्या लागतील.

15 + ☐ = 45




© @KTBS NOT TO BE REPUBLISHED

त्याच प्रमाणे 45 व्या खोलीपासून 66 व्या खोलीकडे जाण्यास प्रथम 2 वेळा उडया मारुन नंतर एक खोली उजवीकडे जावे लागते.

45 + 20 = 65

65 + 1 = 66




दुसऱ्या पद्धतीनेही जाऊ शकतो

सुरुवातीला 45 व्या खोलीपासून एक खोली उजव्या बाजूला जावे. नंतर 46 व्या खोलीपासून 66 व्या खोलीकडे जाण्यास 2 वेळा वर उड्या मारुन जावे लागते.

45 + 1 = 46

46 + 20 = 66



45 पासून 66 च्या खोलीकडे जाण्यासाठी किती खोल्या पार केल्या आहेत - विचार कर

आता तूच प्रयत्न कर - आलेल्या उत्तराच्या खोलीला रंग दे

1) 66 + 10 = _____

2) 73 + 25 = _____


3) 29 मध्ये 9 मिळविल्यास _____

4) 15 मध्ये 13 मिळविल्यास _____

5) 30 मध्ये 20 मिळविल्यास _____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सोपी बेरीज



उदाहरण 1 : नितेश व निर्मला आपल्या आईबरोबर फळांच्या दुकानात जातात.

नितेश : आई. मला डाळिंबे खूप आवडतात.

निर्मला: आई, मला कलिंगडे खूप आवडतात.

आईने नितीशाला 49 रु. किंमतीची डाळिंबे घेऊन दिली. व निर्मलाला 42 रु. किंमतीची कलिंगडे घेऊन दिली.

तर आईने द्यावयाची एकूण रक्कम किती?

दुकानाच्या मालकाने पट्कन सांगितले.

49 म्हणजे 40 व 9

42 म्हणजे 40 व 2

म्हणून 49 व 42 रुपयांची बेरीज केल्यास एकूण 91 रु होतात.

उदाहरण 2

$43 + 35 = \square$

$= 40 + 3 + 30 + 5$

$= 40 + 30 + 3 + 5$

$= 70 + 8$

$= 78$





नंतर फार सोपे

$40 + 30 = 70$

$3 + 5 = 8$

एकूण 78

उदाहरण 3 : दुसऱ्या पद्धतीने पण करता येते

$23 + 64 = 20 + 3 + 60 + 4$

$= 80 + 3 + 4$

$= 80 + 7$

$= 87$



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

याचप्रमाणे तू प्रयत्न कर

$61 + 16 = 60 + \square + 10 + \square$

$= \square + \square + \square$

$= \square + \square$

$= \square$

$43 + 34 = \square + \square + \square + \square$

$= \square + \square + \square$

$= \square + \square$

$= \square$

विचार कर : याचप्रमाणे तीन अंकी संख्यांची बेरीज कशी करावी?



एकदा नागसापाने आपल्या मित्रांसाठी जेवणाची व्यवस्था केली.

आपल्यापासून त्रास झालेल्या उंदीर, बेडूक व कोंबडी यांना त्यांच्या कुटुंबासमवेत जेवणाचे आमंत्रण दिले.

नागसापाच्या या आमंत्रणावर उंदीर, बेडूक व कोंबडी यांनी विश्वास ठेवला नाही. आजपर्यंत आम्हा सर्वांना खाऊन ढेकर देणाऱ्या सापाच्या आमंत्रणाचा त्यांनी तिरस्कार केला.

नागसापाची फार निराशा झाली.


सापाने ''तुम्ही व तुमचे सर्व प्राणी आत येताना मोजून आत या व परत जाताना मोजूनच बाहेर पडा. तुम्हाला मी काही करणार नाही. माझे म्हणणे सत्य आहे. माझ्यावर विश्वास ठेवा. कृपा करुन माझी इच्छा पूर्ण करा व जेवावयास या'' अशी विनंती केली.

सापाचे हे म्हणणे सर्वांना पटले. मोठ्या आकाराच्या हिरव्या रंगाच्या बेडकाने सर्वाना घेऊन यायचे व परत घेऊन जायचे ही जबाबदारी स्वीकारली. एकूण 200 प्राणी येतील असा शब्द सापाला दिला.

सापाच्या घरी जाताना कोणत्या प्राण्याचे किती सदस्य आहेत. हे त्या हिरव्या बेडकाने मोजले. उंदीर - 46, कोंबडी -37, बेडूक - 109

आता सापाच्या घरापासून परत जाणाऱ्या बेडूक व कोंबडी यांची एकूण संख्या किती?

	100	10	1
बेडकांची संख्या :	1	0	9
कोंबडयांची संख्या:		3	7
एकूण :	**1**	**4**	**6**



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

सूचना
- 1 सुटे दर्शविते
- 10 दहाचा गट सुचवितो
- 100 शंभरचा गट सुचवितो

टप्पा 1 :

प्रथम सर्व सुटे मोज 10 चे गट कर. तयार केलेल्या गटाला रंगीत पेनने रेषा मारुन दाखव. तो गट 10 च्या गटात मिळव. राहिलेले एकूण सुटे या स्थानात लिही.

टप्पा 2 :

आता दशक गटाची बेरीज करुन एकूण दशक स्थानात लिही.

टप्पा 3 :

आता शतक गटाची बेरीज करुन एकूण शतक स्थानात लिही.

हे संख्यारुपात लिही

1 सुटे गटात - 6

10 दशक गटात - 4

100 शतक गटात - 1

म्हणून बेडूक व कोंबडी यांची एकूण संख्या - 146

आता या बेंडूक व कोंबडीच्या एकूण संख्येत उंदरांची संख्या मिळव.

	100	10	1			
बेडूक व कोंबड्यांची संख्या:	1	4	6			
उंदरांची संख्या:		4	6			
एकूण :						

विचार कर : हिरव्या रंगाच्या बेडकाने एकूण 200 प्राणी येतील असे सांगितले होते. परंतु आता तेवढे प्राणी आहेत का? काय घडले असेल?

1. केळीचे घड किती?

एका शेतकऱ्याने आपल्या केळीच्या बागेत गेल्या वर्षी 264 केळीचे घड व यावर्षी 123 केळीचे घड पिकविले आहेत. तर त्या शेतकऱ्याने एकूण किती केळीचे घड पिकविले?



© BKTBS NOT TO BE REPUBLISHED

गेल्या वर्षो पिकविलेले केळीचे घड - 264

या वर्षो पिकविलेले केळीचे घड - 123

अंदाज कर

264+123 यांची बेरीज 400 पेक्षा कमी की जास्त ?

आता उत्तर शोध

		100	10	1
गेल्या वर्षी पिकविलेले घड एकूण		2	6	4
या वर्षी पिकविलेले घड	+	1	2	3
त्या शेतकऱ्याने पिकविलेले एकूण केळीचे घड				

त्या शेतकऱ्याने पिकविलेले एकूण केळीचे घड = ☐

2. रजियाजवळ 328 गोटया आहेत. तिच्या मैत्रिणीने कवनाने तिला 133 गोटया भेट म्हणून दिल्या तर रजियाजवळ असलेल्या एकूण गोटया किती?

328 + 133 = ?

बेरीज 450 पेक्षा जास्त की कमी?



© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

आता उत्तर शोध

	100	10	1
	3	2	8
+	1	3	3
एकूण			

रजियाजवळ असणाऱ्या एकूण गोट्या = ☐

अभ्यास 3.1

खालील गोष्टीतील उदाहरण सोडव आणि उत्तर शोधण्याआधी अंदाजे बेरीज सांग

1) अशोक व निश्चिता दोघांनी आपापल्या बागेत गुलाबाची रोपे वाढवली आहेत. अशोकच्या बागेत 266 गुलाबाची फुले आहेत. व निश्चिताच्या बागेत 314 गुलाबाची फुले आहेत तर दोघांची मिळून एकूण किती गुलाबाची फुले आहेत?






© KTBS NOT TO BE REPUBLISHED

		100	10	1
अशोकच्या बागेतील फुले		2	6	6
निश्चिताच्या बागेतील फुले	+	3	1	4
एकूण फुले				

2. धावणारी रेल्वे पहा. C-1 या डब्यात 116 लोक प्रवास करीत आहेत. व C-3 डब्यात 130 लोक प्रवास करीत आहेत. तर या दोन्ही डब्यात मिळून किती लोक प्रवास करीत आहेत?



	100	10	1
C-1 डब्यातून प्रवास करणारे			
C-3 डब्यातून प्रवास करणारे			
एकूण प्रवासी			

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

3) शिक्षकांनी आपल्या शाळेतील गाणे म्हणणाऱ्या व चित्रकलेत भाग घेणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांची यादी केलेली आहे.

विद्यार्थी	गाणे म्हणणारे	चित्रकलेत भाग घेणारे	एकूण
मुलगे	112	284	
मुली	121	248	
एकूण			

शोधून काढ :

1. गाणे म्हणणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या _____
2. चित्रे काढणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या _____
3. शाळेतील गाणे म्हणणाऱ्या व चित्रे काढणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या _____







बेरीज (हातचा न येणारी)

मागील इयत्तेत दोन अंकी संख्येची बेरीज कशी करावी हे समजून घेतले आहेस ते लक्षात घे त्याचप्रमाणे पुढील उदाहरणे सोडव.

उदाहरण : (1)

348 व 231 ची बेरीज किती?

या दोन संख्याची चित्रात दाखविल्या प्रमाणे बेरीज कर.

शतक	दशक	सुटे
		
		
		

© KBS NOT TO BE REPUBLISHED

वरील चित्र स्थानमूल्य कोष्टकात संख्या स्वरूपात लिही.


	शतक	दशक	सुटे
	3	4	8
+	2	3	1
=	5	7	9

बेरजेच्या पायऱ्या


1. संख्या त्याच्या स्थानीय किंमतीनुसार उभ्या ओळीत लिही.
2. सुटे स्थानातील अंकांची बेरीज कर. 8+1=9, 9 सुटे स्थानात लिही.
3. दशक स्थानातील अंकांची बेरीज कर. 4+3=7, 7 दशक स्थानात लिही.
4. शतक स्थानातील अंकांची बेरीज कर. 3+2=5, 5 शतक स्थानात लिही.

म्हणून 348 व 231 ची बेरीज = 579

उदाहरण : एका बुट्टीत 253 आंबे आहेत दुसऱ्या बुट्टीत 323 आंबे आहेत तर दोन्ही बुट्टीत मिळून एकूण किती आंबे आहेत ?



253



323

253 + 323 = ?

	शतक	दशक	सुटे
	2	5	3
+	3	2	3
एकूण	5	7	6

गट		
शंभरचा	दहाचा	सुटयाचा
100 100	10 10 10 10 10	1 1 1
100 100 100	10 10	1 1 1
100 100 100 100 100	10 10 10 10 10 10 10	1 1 1 1 1 1

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

टप्पा 1 : प्रथम सुटयांची बेरीज कर. 3+3=6

टप्पा 2 : दशकाची बेरीज कर. 5+2=7

टप्पा 3 : नंतर शतकाची बेरीज कर. 2+3=5

एकूण 576

म्हणून दोन्ही बुट्टीतील एकूण आंबे ☐

विस्तार करुन लिहिणे व बेरीज करणे

422 व 576 बेरीज करा

	शतक	दशक	सुटे	विस्तार रुप		
	4	2	2	400	20	2
+	5	7	6	500	70	6
एकूण	**9**	**9**	**8**	**900**	**90**	**8**

म्हणून 422 व 576 यांची बेरीज 998 येते

दुसरा क्रम :

716 मध्ये 243 मिळवा.

टप्पा 1: स्थानमूल्यानुसार संख्या उभ्या ओळीत लिही

	शतक	दशक	सुटे
	7	1	6
+	2	4	3

टप्पा 2: सुट्यांची बेरीज कर.

	शतक	दशक	सुटे
	7	1	6
+	2	4	3
			9

टप्पा 3: दशकांची बेरीज कर.

	शतक	दशक	सुटे
	7	1	6
+	2	4	3
		5	9

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

टप्पा 4 : शतकांची बेरीज करा.

	शतक	दशक	सुटे
	7	1	6
+	2	4	3
	9	5	9

आत स्थानमूल्य यादी न वापरता संख्यांचे स्थानमूल्य ओळखून बेरीज करण्याची सवय कर.

उदाहरण : 253 व 413 ची बेरीज किती?

प्रथम स्थानानुसार प्रत्येक अंक एकाखाली एक येतील असे लिही. व बेरीज कर.

$$\begin{array}{r} 253 \\ +\ 413 \\ \hline 666 \end{array}$$

या प्रमाणे तू प्रयत्न कर.

1) 404 व 440 ची बेरीज किती?

2) 435 व 543 ची बेरीज किती?

उदा :सृजन व पूजा दोघेही भाऊ बहीण आहेत. त्या दोघांनी आपापल्या दोन डब्यांमध्ये पैशांची बचत केली आहे. (पैसे साठविले आहेत) डब्यामधले पैसे मोजून पाहिल्यानंतर सृजनच्या डब्यात 248 रुपये व पूजाच्या डब्यात 438 रुपये होते. तर त्या दोघांचे मिळून किती रुपये होतात?




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हातचा येणारी बेरीज

दोन अंकी संख्यांची बेरीज ज्याप्रमाणे करतो त्या प्रमाणे तीन अंकी संख्यांची बेरीज कर (हातचा येणारी)

466 व176 ची बेरीज किती?

या दोन संख्यांची बेरीज चित्रात दाखविल्याप्रमाणे कर.



वरील चित्रानुसार स्थानमूल्य कोष्टका प्रमाणे संख्यारुपात लिही.

	शतक	दशक	सुटे
दशक	1 ←	1 ←	
	4	6	6
+	1	7	6
	6	(1) 4	(1) 2

हातचा येणाऱ्या तीन अंकी संख्यांच्या बेरजेचे टप्पे

1. संख्या स्थानमूल्यानुसार उभ्या ओळीत लिही
2. सुटे स्थानातील अंकांची बेरीजकर — 6+6 =12. सुटे स्थानात 2 लिही. 1 हातचा दशक स्थानात ठेव.
3. दशक स्थानातील अंकांची बेरीज कर — 1+6+7=14. दशक स्थानात 4 लिही. 1 हातचा शतक स्थानात लिही.
4. शतक स्थानातील अंकांची बेरीज कर. — 1+4+1= 6. शतक स्थानात 6 लिही.

म्हणून 466 व 176 ची बेरीज = 642

NOT TO BE REPUBLISHED ©KSB

248 + 438 = ?

	शतक	दशक	सुटे
		1	
	2	4	8
+	4	3	8
	6	8	6

गट		
शंभरचा	दहाचा	सुटयाचा
	10	
100 100	10 10 10 10	1 1 1 1 1 1 1 1
100 100 100 100	10 10 10	1 1 1 1 1 1 1 1
100 100 100 100 100 100	10 10 10 10 10 10 10 10	1 1 1 1 1 1

टप्पा 1 :

सुरुवातीला सुटे गटातील सर्व 1 मोजून 10 चे गट कर. ते गट 10 च्या गटात मिळव. (चित्रात दाखविल्याप्रमाणे) रहिलेले सुटे 1 एकूण सुटे या ठिकाणी लिही.

टप्पा 2 :

नंतर दहाच्या गटातील 10 दशक मोजून एकूण दशक या ठिकाणी लिही.

टप्पा 3 :

त्या नंतर 100 च्या गटातील 100 दशक मोजून एकूण शतक या ठिकाणी लिही.

म्हणून सृजन व पूजा यांनी जमा केलेली एकूण रक्कम = ₹686

याचप्रमाणे

296 व 362 मिळवा

296 + 362 = ?

शतक	दशक	सुटे
1		
2	9	6
3	6	2
6	5	8

गट		
शंभरचा	दहाचा	सुटयाचा
100		
100 100	10 10 10 10 10 10 10 10 10 10	1 1 1 1 1 1
100 100 100	10 10 10 10 10 10	1 1
100 100 100 100 100 100	10 10 10 10 10	1 1 1 1 1 1 1 1

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

टप्पा 1 :

प्रथम सुटे गटातील सर्व सुटे मिळवून एकूण सुटे या स्थानात लिही.

टप्पा 2 :

नंतर दहाच्या गटातील सर्व  दशक मिळवून शंभरचा गट तयार कर. तो शंभरच्या गटात मिळव. (चित्रात दाखविल्या प्रमाणे) उरलेले दहाचे गट एकूण दशक स्थानात लिही.

टप्पा 3 :

* त्यानंतर शंभरच्या गटातील  शतक मिळवून एकूण शतक या स्थानात लिही.
* त्यानंतर उत्तर (एकूण) स्थानातील अंक संख्यारुपात लिही.

सुटे गटात - 8

दहाच्या गटात - 5

शंभरच्या गटात - 6

म्हणजे 296 व 362 ची बेरीज = 658

विस्तार रुपात लिहून बेरीज करणे

365 व 246 ची बेरीज कर

	शतक	दशक	सुटे	विस्तारित रूप		
	1	1		100	10	
	3	6	5	300	60	5
+	2	4	6	200	40	6
	6	1	1	600	10	1

दुसरा क्रम :

* 696 मध्ये 146 मिळव.

टप्पा 1 :

स्थानमूल्यानुसार संख्या उभ्या ओळीत लिही.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

	शतक	दशक	सुटे
	6	9	6
+	1	4	6

टप्पा 2 : सुट्यांची बेरीज कर व हातचा 10 च्या स्थानात ठेव

	शतक	दशक	सुटे
		^{1}	
	6	9	6
+	1	4	6
			12

टप्पा 3 : दशकांची बेरीज कर व हातचा 100 च्या स्थानात ठेव.

	शतक	दशक	सुटे
	^{1}	^{1}	
	6	9	6
+	1	4	6
		14	2

टप्पा 4 : शतकांची बेरीज कर व लिही.

	शतक	दशक	सुटे
	^{1}	^{1}	
	6	9	6
+	1	4	6
	8	4	2

आता स्थानमूल्य यादी न वापरता संख्या स्थानीय किंमतीनुसार लिहून बेरीज करण्याची सवय कर.

उदाहरण : 456 व 367 यांची बेरीज कर.

	^{1}4	^{1}5	6
+	3	6	7
	8	2	3

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

याच प्रमाणे तू प्रयत्न कर.

1) 605 आणि 387 ची बेरीज कर.

2) 578 व 277 ची बेरीज कर.

लक्षात ठेव: * ज्या संख्येची बेरीज व्हावयाची आहे त्याला - संकल्य
* जी संख्या त्यात मिळवायची आहे तिला - संकलक
* मिळवून येणाऱ्या उत्तराला - बेरीज असे म्हणतात.

उदा : 825 - संकल्य
+112 - संकलक
937 - बेरीज

अभ्यास 3.2

I. खालील संख्या स्थानमूल्य यादीत लिही व बेरीज कर.

उदा:

500 + 301

	शतक	दशक	सुटे
	5	0	0
+	3	0	1
	8	0	1

1) 175 + 201

	शतक	दशक	सुटे
+			

2) 372 + 627

	शतक	दशक	सुटे
+			

3) 610 + 270

	शतक	दशक	सुटे
+			

4) 444 + 444

	शतक	दशक	सुटे
+			

5) 711 + 211

	शतक	दशक	सुटे
+			

@KRBS NOT TO BE REPUBLISHED

II. खालील संख्या स्थान मूल्य यादीत लिहून बेरीज कर.

उदा:

172 + 179

शतक	दशक	सुटे
1	1	
1	7	2
1	7	9
3	5	1

1. 411 + 299

शतक	दशक	सुटे

2. 362 + 428

शतक	दशक	सुटे

3. 715 + 176

शतक	दशक	सुटे

4. 628 + 325

शतक	दशक	सुटे

5. 547 + 278

शतक	दशक	सुटे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

III. नमुना उदाहणाप्रमाणे खालील गणिते उभ्या ओळीत लिहून बेरीज कर.

उदाहरण : 427 + 132

```
  4 2 7
+ 1 3 2
-------
  5 5 9
-------
```

1. 333 + 555 2. 841 + 136 3. 504 + 405

4. 720 + 171 5. 205 + 473 6. 461 +28

IV. खालील उदाहरणात दाखविल्याप्रमाणे गणिते उभ्या ओळीत लिहून बेरीज कर.

उदाहरण : 527+284

$$\begin{array}{r} {\scriptstyle 1\ 1\ \ } \\ 5\ 2\ 7 \\ +\ 2\ 8\ 4 \\ \hline 8\ 1\ 1 \end{array}$$

1) 474+359 2) 684+310 3) 578+190


4) 336+478 5) 552+391 6) 481+888


@KTBS NOT TO BE REPUBLISHED


कृती करा व हसा

खालील चित्र पहा. गोपाळ व सुरेखा यांच्या हातात असलेल्या संख्या कार्डांचे निरीक्षण कर. नंतर आंब्याच्या चित्रावरील बेरजेची उदाहरणे सोडव 769 उत्तर येणारी फळे गोपाळला व 425 उत्तर येणारी फळे सुरेखाला दे कोणते फळ कोणाला मिळणार हे रेष मारुन दाखव. दोघांना फळे वाटून झाल्यावर उरलेली फळे तुला घे.





























@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कोणाला किती फळे मिळाली? तुला किती फळे मिळाली ?

उदाहरणांची रचना

खाली काही गणिताची उदाहरणे दिली आहेत. प्रथम त्याचे उत्तर मिळव. व सर्व गणिताची उत्तरे तुलना करुन बघ.

215	235	200	300	175
+ 115	+ 95	+ 130	+ 30	+ 155
___	___	___	___	___

प्रत्येक गणिताचे उत्तर किती?

330

म्हणजे एकच उत्तर येईल या रीतीने अनेक गणिताच्या उदाहरणांची रचना करता येईल का?

तू प्रयत्न कर?


वरील रीती प्रमाणे खालील गणिताचे उत्तर एकच आहे. पण वेगवेगळ्या संख्या लिहून उदाहरणांची रचना कर.

उदा:	1	2	3	4
90 + 65 **155**	+ ___ **155**	+ ___ **155**	+ ___ **155**	+ ___ **155**
150 + 130 **280**	+ ___ **280**	+ ___ **280**	+ ___ **280**	+ ___ **280**
388 + 188 **576**	+ ___ **576**	+ ___ **576**	+ ___ **576**	+ ___ **576**

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

कृती कर आणि हस

चरण जवळ उत्तर असलेले कार्ड आहे. सदर उत्तरासाठी कोणकोणत्या चॉकलेटवर गणिताचे उदाहरण आहे. ते रेष मारुन दाखव.



© SCERT NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास 3.3

1. रेष मारुन जोड्या जुळव

उत्तर	उदाहरण
1. 401	378 + 422
2. 919	467 + 53
3. 681	288 + 113
4. 800	478 + 441
5. 520	327 + 354

II. खालील प्रत्येक संख्येला दोन उदाहरणांची रचना कर.

उदाहरण :

499

200 + 299 = 499

385 + 114 = 499

1. 88

2. 222

3. 615

4. 378

5. 764

6. 300

7. 850

8. 705

@KYRS NOT TO BE REPUBLISHED

अंदाजे बेरीज

कोणाचा अंदाज बरोबर आहे?

चित्राचे निरीक्षण कर. मोगऱ्याचा फुलांच्या वेलीखाली किती फुले पडलेली आहेत? अंदाज करुन सांग.



महम्मद — तीस


अनुष — चाळीस

खाली पडलेली फुले मोज. कोणाचा अंदाज बरोबर आहे ते पहा. एकूण 38 फुले पडलेली आहेत.

कोणाचा अंदाज बरोबर आहे?


अनुषाचा अंदाज बरोबर आहे. कारण 38 ही संख्या 40 ला फार जवळ आहे.

आता संख्यारेषेच्या आधारे व्यवास्थित समजून घे.




दहापर्यंत अंदाजे किंमत समजून घेणे.

एक संख्या रेषा काढून 10 ते 20 पर्यंत संख्या लिहा.



मधोमध असलेल्या संख्येला खूण कर. सुटे स्थानात 5 असणारी संख्या कोणत्याही 2 दशकाच्या मधोमध असणारी संख्या असते.

नंतर डावी बाजू व उजवी बाजू यांची खूण कर.



© KBS NOT TO BE REPUBLISHED

संख्यारेषेवर असल्याप्रमाणे


* 15 च्या डाव्या बाजूला असणाऱ्या संख्या 11, 12, 13, 14 या दहाच्या जवळ आहेत म्हणून 11,12,13,14 यांची दशकापर्यंतची अंदाजे किंमत 10.
* 15 च्या उजव्याबाजूला असणाऱ्या संख्या 16,17,18,19 या 20 च्या जवळ आहेत म्हणून 16,17,18,19 यांची दशका पर्यंतची अंदाजे किंमत 20.



कोणत्याही दोन दशकाच्या मधोमध असणाऱ्या संख्येची अंदाजे किंमत सांगताना पुढच्या दशकाच्या बरोबरची किंमत सांगितली जाते म्हणून 15 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत - 20

आता तूच प्रयत्न कर.

खाली दिलेल्या संख्यारेषेचे निरीक्षण कर व खालील प्रश्नांची उत्तरे दे.



1. 52 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत _____
2. 57 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत _____
3. 55 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत _____
4. 54 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत _____
5. 56 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत _____

उदाहरणांचे निरीक्षण कर.

उदाहरण 1 : 43 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत किती?

* सुटे स्थानाचा अंक 5 पेक्षा कमी आहे म्हणून त्याच्यामागील दशक स्थानाचा अंक तसाच लिही - 4
* नंतर सुटे स्थानात शून्य लिहिल्यास 40 होतात. म्हणून 43 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत 40

उदाहरण 2 : 47 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत किती?

* सुटे स्थानात 5 पेक्षा मोठा अंक आहे.
* म्हणून त्याच्या मागे असलेल्या दशक स्थानातील अंकामध्ये एक मिळवा व लिहा.

$4 + 1 = 5$

* नंतर सुटे स्थानात एक शून्य लिहा. 5 नंतर सुटे स्थानात शून्य लिहिल्यास 50 होतात. म्हणून 47 ची दशक स्थानापर्यंतची अंदाजे किंमत 50 आहे.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

लक्षात ठेवा

* दशक स्थानातील बरोबरीने अंदाजे किंमत काढताना सुटे स्थानातील अंकाकडे लक्ष द्या.
* सुटे स्थानात 5 पेक्षा लहान अंक असेल तर मागच्या दशक स्थानाच्या किंमती एवढी अंदाजे किंमत असते.
* सुटे स्थानात 5 किंवा 5 पेक्षा मोठा अंक असेल तर पुढच्या दशकापर्यत अंदाज करावा.

आता तूच प्रयत्न कर:

सुटे स्थानातील अंकाकडे लक्ष दे. खालील संख्यांची दशक स्थानापर्यंतची अंदाजे किंमत लिही.

1. 23 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत _____
2. 66 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत _____
3. 85 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत _____
4. 78 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत _____
5. 93 ची दशकापर्यंतची अंदाजे किंमत _____

आता बेरजेची उदाहरणे सोडविताना एकूण बेरजेची अंदाजे किंमत कशी काढावी हे समजून घे.

उदाहरण 1 : 46 व 23 यांची अंदाजे बेरीज किती?

46 ची अंदाजे किंमत = 50
23 ची अंदाजे किंमत = 20
अंदाजे बेरीज = 70

म्हणून 46 व 23 यांची अंदाजे बेरीज 70 आहे.

उदाहरण 2 : 21 व 35 यांची अंदाजे बेरीज किती?

21 ची अंदाजे किंमत = 20
35 ची अंदाजे किंमत = 40
अंदाजे बेरीज = 60

म्हणून 21 व 35 यांची अंदाजे बेरीज 60 आहे.

उदाहरण 3 : 55 व 26 ची अंदाजे बेरीज किती?

55 ची अंदाजे किंमत = 60
26 ची अंदाजे किंमत = 30
अंदाजे बेरीज = 90

म्हणून 55 व 26 ची अंदाजे बेरीज 90 आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास 3.4

I. खालील संख्यांची अंदाजे बेरीज सांग

1. 62 व 23


2. 29 व 47

3. 71 व 15

4. 58 व 35

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

II. कार्डावर लिहिलेल्या गणिताची अंदाजे बेरीज कर कोणत्या गणिताला कोणते उत्तर आहे ते रेषा मारुन दाखव.



*****

प्रकरण 4

वजाबाकी

K8C4V3

हे प्रकरण शिकल्यानंतर तू

* चित्रामध्ये व गोष्टीमध्ये व्यक्त झालेल्या वेगवेगळ्या संदर्भानुसार वजाबाकीची उदाहरणे सोडवशील.
* स्थानमूल्य यादीचा वापर करुन वजाबाकी करशील.
* तीन अंकी संख्या उभ्या ओळीत लिहून हातचा येणारी व हातचा न येणारी वजाबाकी करशील.
* वजाबाकीच्या उदाहरणांची रचना करशील.
* उत्तर 99 पेक्षा जास्त येणार नाही अशी वजाबाकीची अंदाजे उदाहरणे सोडवशील.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पुस्तकांचा व्यापार

रंगण्णा व राजण्णा हे दोघे फार वर्षांपासून एकमेकांचे मित्र आहेत. त्या दोघांची पुस्तकांची दुकाने एकमेकाला लागून आहेत व ते व्यापार करीत आहेत.



रंगण्णाच्या दुकानातील पुस्तकांची संख्या – 468

राजण्णाच्या दुकानातील पुस्तकांची संख्या – 365


तुला माहित असल्याप्रमाणे
रंगण्णाच्या दुकानात जास्त पुस्तके आहेत
राजण्णाच्या दुकानात कमी पुस्तके आहेत

कल्पना कर

राजण्णाच्या दुकाना पेक्षा रंगण्णाच्या दुकानात किती पुस्तके जास्त आहेत?
शंभरपेक्षा जास्त की शंभरपेक्षा कमी?

राजण्णाच्या दुकानापेक्षा रंगण्णाच्या दुकानात किती पुस्तके जास्त आहेत आता समजून घे. नंतर तुझी कल्पना बरोबर आहे की चूक याची तपासणी कर.

	100	10	1
रंगण्णाच्या दुकानातील पुस्तके	4	6	8
राजण्णाच्या दुकानातील पुस्तके	3	6	5
रंगण्णाच्या दुकानातील जास्त असलेली पुस्तके	1	0	3



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वर दाखविल्याप्रमाणे

प्रथम 1 सुटे गटाची वजाबाकी करुन उत्तर सुटे स्थानात लिही.

नंतर 10 गटाची वजाबाकी करुन उत्तर दशक स्थानात लिही.

नंतर 100 गटाची वजाबाकी करुन उत्तर शतक स्थानात लिही.

नंतर ते संख्यावाचक या स्वरूपात लिही.


1 च्या गटात 3

10 च्या गटात 0

100 च्या गटात 1

म्हणून रंगण्णाच्या दुकानात राजण्णाच्या दुकानापेक्षा 103 पुस्तके जास्त आहेत.

आता तूच प्रयत्न कर.



© KSTB NOT TO BE REPUBLISHED

सुस्मिता पुस्तकाच्या दुकानातून 150 ₹. चे पुस्तक विकत आणते. ती दुकानदाराला 200₹. देते (शंभर रुपयाच्या 2 नोटा) तर त्या दुकानदाराने सुस्मिताला किती रुपये परत द्यावेत?

	100	10	1
सुस्मिताने दुकानदाराला दिलेले रुपये ₹	2	0	0
सुस्मिताने घेतलेल्या पुस्तकाची किंमत ₹	1	5	0
दुकान दाराने सुस्मिताला परत द्यावयाची रक्कम			

म्हणून दुकानदाराने सुस्मिताला परत द्यावयाची रक्कम ₹ _____

माकडाला मदत करा

एकदा जंगलात कोल्ह्याने केळ्यांची विक्री करण्याचे काम सुरु केले. जंगलातील माकडांना व हत्तींना आनंदी आनंद झाला.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

